-327-

~~१७~~ 73e-

(३३)

3-

विषय:- गांवठाणातील पूरबाधीत [तांबडया पट्टयातील] शासकीय जमिनींचे अकृषिक प्रयोजनासाठी वाटप करण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:एलएनडी-१०८९/सीआर १५०/ज-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २९ नोव्हेंबर, १९८९.

परिपत्रक :-

महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे]नियम, १९७१ च्या नियम ३० मधील तरतूदीनुसार कोणत्याही कारणावरुन संपूर्ण गावाची जागा किंवा तीचा भाग यांचा त्याग करण्याचे ठरविण्यात आल्यास नवीन सरकारी जागा गावासाठी निवडली जाते किंवा जेथे सरकारी जमीन उपलब्ध नसेल तेथे त्या प्रयोजनासाठी योग्य अशी खाजगी जमीन संपादन करुन दिली जाते. अशारितीने नवीन गावठाणामध्ये पुनर्वसन झाल्यानंतर जुन्या गावठाणाची जागा सरकार जमा होते व ती जागा शासकीय जमीन म्हणून उक्त नियमाखाली पुन: वाटपासाठी उपलब्ध होते.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की ज्या गावठाणांच्या जागा पूर बाधित [तांबडया पट्टयात] क्षेत्रात येतात तेथील व्यक्तिंच्या जीवीताच्या व मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षित अशा ठिकाणी [हिरवा पट्टा] पुनर्वसनासाठी नवीन गांवठाणासाठी सरकारी जागा दिल्यानंतर तांबडया पट्टयातील जमिनी सरकार जमा झाल्यावर त्या पुन: अकृषिक प्रयोजनासाठी जिल्हाधिका-यांकडून दिल्या जातात. त्या जमिनी तांबडया पट्टयात असल्यामुळे तेथे वास्तव्य करणा-या नवीन व्यक्तींना पूराचा धोका कायमच असतो. त्यामुळे पूर परिस्थितीमध्ये त्यांच्याही स्थलांतराचा प्रश्न निर्माण होतो आणि त्यांना नव्याने सुरक्षित अशा सरकारी जागेत [हिरवा पट्टयात] हलवावे लागते. मनुष्य व वित्त हानी यांचा विचार करता पूरबाधीत अशा तांबडया पट्टयातील सरकारी जागा अकृषिक प्रयोजनासाठी विशेषत: निवास प्रयोजनासाठी देणे ही बाब योग्य नाही. तेव्हा, याद्वारे सर्व विभागीय आयुक्तांना/जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येत आहेत की जेव्हा सुरक्षिततेच्या कारणावरुन पूरबाधीत अशा तांबडया पट्टयातील जमिनी सरकार जमा करुन तेथील लोकांच्या पुनर्वसनासाठी हिरव्या पट्टयातील सरकारी जमिनी देण्यात येतात तेव्हा अशा तांबडया पट्टयातील सरकार जमा झालेल्या जमिनी पुन: कोणत्याही परिस्थितीमध्ये अकृषिक प्रयोजनासाठी विशेषत: निवास प्रयोजनासाठी यापुढे देण्यात येवू नयेत.

३. सर्व संबंधितांनी शासनाच्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर सूचना जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय महसूल

अधिका-यांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[अ. गो. देशपांडे]
सहाय्यक सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति